नोंदणी क्र .MSCS/CR/1259/2016 रिझर्व्ह बँक क्र.पी.६८७

अमृतमहोत्सवी

# श्री वीरशैव को-ऑप.बँक लि.,कोल्हापूर (मल्टीस्टेट बँक)

नोंदणीकृत कार्यालय – ५१७,ए/१, ताराराणी चौक, कोल्हापूर ४१६००१ फोन - (०२३१)२५३६९४० ते ४२

**Website - www.veershaivbank.co.in E-mail - info@shriveershaivbank.com**

## वार्षिक सर्वसाधारण सभा जाहीर नोटीस

**(फक्त भागधारक सभासदांकरिता)**

आपल्या बँकेच्या सर्व भागधारक सभासदांना कळविण्यात येते की, बँकेची सन २०२१-२२ या सालची **वार्षिक सर्वसाधारण सभा मंगळवार,२७.०९.२०२२ इ. रोजी दुपारी २.०० वाजता** आपल्या बँकेच्या प्रधान कार्यालय, ताराराणी चौक, कोल्हापूर येथील सभागृहात खालील विषयांवर विचार विनिमय करणेसाठी होणार आहे. तरी सदर सभेस आपण उपस्थित रहावे, अशी विनंती आहे.

### ♦ सभेपुढील विषय ♦

१. दि.२९.०९ .२०२१ रोजीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे(e-AGM) इतिवृत्त वाचून कायम करणे.

२. सन २०२१-२०२२ चा वार्षिक अहवाल आणि दि.३१ मार्च २०२२ चा लेखापरिक्षीत ताळेबंद,नफा-तोटा पत्रकाचा विचार करणे व स्विकृत करणे.

३. सन २०२१-२०२२ सालात अंदाजपत्रकापेक्षा जादा झालेल्या खर्चास व सन २०२२-२०२३ या सालाकरीता संचालक मंडळाने सुचविलेल्या उत्पन्न व खर्चाचे अंदाजपत्रकास मंजुरी देणे .

४. सन २०२१-२०२२ सालची मा.संचालक मंडळाने सुचविलेली नफा विभागणी मंजूर करणे आणि लाभांश शिफारशी प्रमाणे जाहीर करणे.

५. मागील वर्षातील बँक व्यवसाय लक्ष्यपूर्ती (Target Achievements)आणि सन २०२२-२०२३ चे व्यवसाय लक्ष्य (Targets) व विकास आराखडा नोंद घेणे.

६. सन २०२१-२०२२ या सालचे वैधानिक लेखापरिक्षक गोगटे आणि कंपनी पार्टनर श्री उमेश गोगटे यांचेकडून आलेला वैधानिक लेखापरिक्षण अहवाल व सन २०२०-२०२१ च्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालाचा दोष दुरूस्ती पूर्तता अहवाल स्विकृत करणे.

७. सन २०२२-२०२३ या सालाकरिता रिझर्व्ह बँकेने दिलेल्या मान्यतेनुसार मे.गोगटे आणि कंपनी, चार्टर्ड अकौंटंट, पुणे या फर्मची वैधानिक लेखापरिक्षक म्हणून नेमणूकीस मंजूरी देणे व त्यांचा मेहनताना ठरविण्याचे अधिकार संचालक मंडळास प्रदान करणे.

८. सन २०२१-२०२२ सालात संचालक व त्यांचे नातेवाईकांना दिलेल्या कर्जाच्या माहितीची नोंद घेणे.

९. सन २०२२-२३ करिता संचालक मंडळाने सुचवलेल्या एकरकमी कर्ज परतफेड(OTS) योजनेची नोंद घेणे व सन २०२१-२०२२ सालात बँकेच्या एकरक्कमी कर्ज परतफेड योजनेअंतर्गत सवलत देणेत आलेल्या कर्जखात्यांची नोंद घेवून त्यास मंजुरी देणे.

१०. शासन अधिकृत वसुली अधिकारी यांनी शिफारस केलेली वसुली होणे अशक्य असलेली व वैधानिक लेखापरिक्षक यांनी प्रमाणित केलेली कर्जखाती निर्लेखीत करणेबाबत केलेल्या शिफारशीनुसार कर्जे निर्लेखीत करणेस आणि मा.संचालक मंडळाने कर्जातील दिलेल्या व्याज,दंड व्याज, खर्च इ. सवलतीस मान्यता देणे.

११. व्यवस्थापकीय संचालक (Managing Director) पदी प्राधान्य क्रमानुसार श्री प्रकाश नारायण पाटील यांची रिझर्व्ह बँकेच्या मंजुरी अंतरावर नेमणूक देणेबाबत चर्चा करून निर्णय घेणे.

१२. वार्षिक सर्वसाधारण सभेस हजर नसलेल्या सभासदांच्या अनुपस्थितीस माफी (Condone) बाबत विचार करणे.

१३. कर्मचारी आराखड्यामध्ये सुधारणा करणेबाबत आलेल्या प्रस्तावावर चर्चा करून निर्णय घेणे.

१४. मा.अध्यक्षसो यांचे परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयांवर चर्चा करणे.

**मा.संचालक मंडळाच्या आदेशावरून**

स्थळ – कोल्हापूर

तारीख – ०२.०९.२०२२

**अविनाश रामचंद्र खोत**
व्यवस्थापकीय संचालक (प्रभारी)

**राजेंद्र तुकाराम लकडे**
**अध्यक्ष**

## ♦ विशेष सुचना ♦

१. ठरलेवेळी गणपूर्ती न झालेस नोटीसीत नमूद केले ठिकाणी अर्ध्या तासानंतर वार्षिक सर्वसाधारण सभा घेणेत येईल व त्याला गणपूर्तीची आवश्यकता असणार नाही. त्यात वरील विषयांचा विचार केला जाईल.

२. सन्माननीय सभासदांनी सभेपुढील ठेवावयाच्या आपल्या काही सुचना असतील तर बँकेच्या प्रधान कार्यालयाकडे दि.१७.०९.२०२२ पर्यंत पोहोचतील अशा पाठवाव्यात. त्यानंतर येणाऱ्या सुचनांचा विचार केला जाणार नाही.

३. वार्षिक सर्वसाधारण सभेची सविस्तर नोटीस बँकेच्या www.veershaivbank.co.in संकेतस्थळावर आणि बँकेचे प्रधान कार्यालय व सर्व शाखा कार्यालयामध्ये उपलब्ध आहे.

४. सन २०२१ – २२ चा वार्षिक अहवाल बँकेच्या www.veershaivbank.co.in या संकेतस्थळावर दि.१२.०९.२०२२ रोजी पासून उपलब्ध आहेत.

५. ज्या सभासदांची मुले / मुली १० वी, १२ वी व पदवीधर / पदव्युतर परीक्षेत २०२२ मध्ये ८०% पेक्षा जास्त गुण मिळवून उत्तीर्ण झालेली आहेत त्यांनी आपली नावे दि.२०.०९.२०२२ पूर्वी प्रधान कार्यालयात पाठवावीत.

६. ज्या सभासदांचा निवासी / व्यवसायाचा पत्ता बदलेला असलेस नवीन पत्ता बँकेस ताबडतोब कळवावा.

७. आपले भाग दाखले (शेअर्स सर्टिफिकेट ) नजीकच्या शाखेशी संपर्क साधून कार्यालयीन वेळेत घेऊन जावेत.

८. ज्या सभासदांची भाग धारणा ही रु.५००/- च्या पठीत नसेल अशा भागधारक सभासदांनी आपल्या नजीकच्या शाखेशी संपर्क साधून आवश्यक ती जादा भाग धारणा रक्कम भरावी ही विनंती.

९. सभासदांची लाभांश रक्कम सेव्हींग / चालू खातेवर परस्पर वर्ग करणेत येणार आहे.तरी ज्या सभासदांनी आपली सेव्हींग / चालू खाती उघडलेली नाहीत / बंद केलेली आहेत अशा सभासदांनी आपली सेव्हींग / चालू खाती उघडून घ्यावीत.

१०. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या सूचनेनुसार, बँकेचे सभासद व ग्राहक यांनी आपल्या के.वाय.सी (KYC) ची पूर्तता करणे बंधनकारक असून ज्या खातेदारांनी याची पूर्तता केलेली नाही त्यांनी त्वरित बँकेशी संपर्क साधून त्याची पूर्तता करावी. तसेच ज्यांची Re-KYC करणे आवश्यक आहे त्यांनी त्वरित आपल्या नजीकच्या शाखेशी संपर्क करून त्याची पूर्तता करावी. KYC पूर्ण नसलेली खाती डेबिट फ्रीज होतात.

११. १० वर्ष व्यवहार नसलेली खाती रिझर्व्ह बँकेच्या DEAF योजने अंतर्गत रिझर्व्ह बँकेकडे वर्ग होतात.

१२. या वर्षीची वार्षिक सर्वसाधारण सभा ही सभासदांच्या प्रत्यक्ष उपस्थित होणार असून सभेमध्ये उपस्थित राहणाऱ्या सभासदांना महाराष्ट्र शासन व / अथवा कोल्हापूर महानगरपालिका यांच्या उपस्थितीच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करावे लागणार आहे.